17th Edition
HGH INDIA® 2025
HOME DECOR ■■■ GIFTS ■■■ HOUSEWARE
July 01-04, 2025. Bombay Exhibition Center, Mumbai

NEWS 2

A TEXZONE Event

Where business feels at home!

# होम टेक्स्टाइल्समधले नवे ट्रेंड्स

HGH India ची १७ वी आवृत्ती भारतातील ७०० शहरे आणि गावे तसेच इतर ३० देशांतील ट्रेड व्हिजिटर्सचे १ ते ४ जुलै २०२५ दरम्यान स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. हा ट्रेड शो बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे.

एक्झिबिटर्स या रिटेल सीझनच्या सुरुवातीलाच त्यांच्या नाविन्यपूर्ण उत्पादनांचे रिटेलर्स, वितरक, ओईएम खरेदीदार, आयातदार आणि संस्थात्मक ग्राहकांना सोर्सिंग करण्यासाठी सज्ज आहेत. ट्रेड बायर्सही नाविन्यपूर्ण उत्पादने, २०२५-२६ चे ट्रेंड्स, नवे सोर्सेस, नवीन व्यावसायिक संकल्पना आणि HGH India मध्ये हजेरी लावणार असलेल्य◌े आघाडीच्या ब्रँड्ससह भागिदारी करण्यासाठी उत्सुक आहेत. ७०० ब्रँड्स आणि ३३ देशांतील उत्पादक त्यांच्या होम प्रॉडक्ट्सची श्रेणी इथे उपलब्ध करून देणार आहेत. बहुतेक एक्झिबिटर्स आपली नवी उत्पादने आणि श्रेणी २०२५-१६ च्या रिटेल सीझनसाठी सादर करतील.

परत एकदा HGH India मध्ये तुमचे स्वागत करण्यासाठी आम्ही तयारी करत असून या शो मध्ये व्यवसायही सहजसोपा वाटतो. आघाडीच्या एक्झिबिटर्सची नाविन्यपूर्ण उत्पादने आणि नवीन व्यावसायिक संकल्पना HGH India च्या आगामी आवृत्तीमध्ये अनुभवता येतील.

## होम टेक्स्टाइल्स

### स्प्रेड होम

स्प्रेड हा बेड, बाथ आणि होम डेकॉर क्षेत्रातील अग्रणी ब्रँड असून भारतातील आघाडीच्या स्टोअर्समध्ये कार्यरत आहे. ब्रँडद्वारे कॉटन, बांबू, टेन्सेल, कोरल आणि इतर विविध प्रकारच्या नैसर्गिक व स्पेशॅलिटी फायबरपासून बनवलेली प्रीमियम उत्पादने उपलब्ध केली जातात. नाविन्य आणि डिझाइन, उपयुक्तता व आरामदायीपणा यांचा अनोखा मेळ या उत्पादनांमध्ये घातलेला असतो. स्प्रेड होमद्वारे HGH India च्या या आवृत्तीमध्ये विविध नवीन उत्पादने सादर केली जाणार आहेत.


Bamboo Towels


Outlast Cooling Comforter

स्प्रेड स्पेनद्वारे आउटलास्ट कुलिंग कम्फर्टर सादर केले जात असून त्यात नासापासून प्रेरित आउटलास्ट तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे, जे झोपेच्या वेळेस तापमान योग्य राखण्यास मदत करते. झोपेच्या वेळेस तापमान योग्य राखण्यासाठी ते स्वतःच उष्णता साठवते आणि बाहेर टाकते. पर्यायाने तापमान जास्त थंड किंवा जास्त गरम यापैकी काहीही न राहाता अगदी योग्य राहाते.

ग्राहकांना पिसासारखा हलकेपणा, मऊशारपणा आणि आलिशानपणा प्रीमियम यार्न व आउटलास्ट फिलिंगच्या मदतीने अनुभवता येतो. स्प्रेड स्पेन कम्फर्टर हे OEKO-TEX STANDARD 100 सर्टिफाइड असून ते त्वचास्नेही व हायपोअलर्जेनिक आहे. झोपताना उकडा जाणवणाऱ्यांसाठी ते योग्य आहे. उच्च दर्जा, टिकाऊपणा, देखभाल क रण्यास सोपे असल्यामुळे शांततामय झोपेसाठी ते एक चांगले गिफ्ट ठरू शकते.

स्प्रेड होमद्वारे रोजच्या वापराच्या टॉवेल्सची नवी श्रेणी सादर केली जाणार असून ते मऊ, दर्जेदार कापड आणि उठावदार रंग, स्टायलिश डिझाइनसह तयार करण्यात आले आहेत. यामुळे तुमच्या दिनक्रमाला आलिशानतेचा स्पर्श मिळेल. टॉवेल्सची ही नवी श्रेणी फक्त अंग पुसण्यासाठीच नव्हे, तर फॅशन स्टेटमेंट म्हणूनही उत्तम आहे.

### अक्सा फायबर्स

**अक्सा अक्रिलिक** या जगातील आघाडीच्या अक्रेलिक फायबर्स निर्मात्या कंपनीद्वारे **अक्रील्युना, अक्रील्युशन** आणि **अरमोरा** या तीन प्रमुख ब्रँड्सद्वारे होम टेक्स्टाइल्स विभागात नाविन्यपूर्ण उत्पादने सादर केली जाणार आहेत.

जगभरातील टेक्स्टाइल इंडस्ट्रीद्वारे बऱ्याच वर्षांपासून अक्रील्युना फायबर्स यशस्वीपणे वापरले जात आहे. ते प्रामुख्याने बेडिंगसाठी विशेषतः फ्लॅनेल कापडात वापरले जाते. यामुळे कापडाला ऊब आणि आरामदायीपणा मिळतो. अक्रील्युना एव्हरफ्रेश फायबर्स टॉवेल उत्पादनात वापरले जातात आणि त्यातील घटकांमुळे सूक्ष्म जिवाणूंची वाढ रोखली जाते.

त्याशिवाय नव्याने लाँच करण्यात आलेले **वन्सडाय फायबर्स** कॉटन व इतर सेल्युलॉसिक फायबरसह डाय करता येते. ब्लेंड्समध्ये डाय करण्याची प्रक्रिया सहजपणे एकत्रित करता येत असल्यामुळे उर्जा, वेळ आणि पाण्याची बचत होते.


Acryluna Fibre

अक्साद्वारे **अक्रील्युशन**- फिलामेट अक्रेलिक फायबरपासून बनवलेले हँडमेड तसेच मशिन- मेड **परफॉर्मन्स कार्पेट्स** सादर केले जाणार आहेत. हे कार्पेट्स **सोपी देखभाल** आणि **उच्च युव्ही रेसिस्टन्ससाठी** ओळखले जात असल्यामुळे दीर्घकाळ अंतर्गत आणि बाह्य वापरासाठी आदर्श आहेत.

त्याचबरोबर अक्साद्वारे **अरमोरा** हे उच्च दर्जाची कामगिरी करणारे **मोडअक्रेलिक फायबर** हायलाइट केले जाईल. ते होम टेक्स्टाइल क्षेत्रात फ्लेम रिर्टांडंट (एफआर) गुणधर्म आवश्यक असलेल्या उत्पादनांत वापरले जाते. अरमोराद्वारे टिकाऊपणा, सुरक्षितता व सौंदर्य यांचा अनोखा ताळमेळ साधला जातो.

### रेमंडतर्फे स्टायलिश बेडिंग

रेमंड होम या आघाडीच्या आणि बेड लिनन, बाथ, ब्लँकेट्स, शाल


Acrylusion Carpet

कंटेम्परररी ■ फ्युचरिस्टिक ■ सस्टेनेबल

उपलब्ध करणाऱ्या होम लिनन ब्रँड्सद्वारे दशकभराच्या कालावधीनंतर HGH India मध्ये पुनरागमन केले जात आहे. ब्रँडतर्फे कित्येक दशकांचा अनुभव आणि ब्रँडचा शतकभराचा वारसा यांच्या समीकरणातून तयार करण्यात आलेल्या पूर्णपणे नव्या श्रेणी उपलब्ध केल्या जाणार आहेत. ही सर्व कलेक्शन्स उच्च दर्जाचे कापड, आरामदायीपणा व अनोख्या स्टाइलसह तयार करण्यात आली आहेत.

**बेडलिनन** रेंजमध्ये **निओट्रॉपिक** कलेक्शनचा समावेश असून ते त्यांच्या डिझाइन स्टुडिओमध्ये हाताने तयार केलेले, रंगवलेले आहे. त्यात फुलांच्या तसेच भौमितिक आकारांचा लेआउट पाहायला मिळतो. **एव्हरफ्रेश कलेक्शनमध्ये** नाविन्यपूर्ण स्टेन आणि स्पिल रिपेलंट बेडशीट्सचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांची


Everfresh Collection

देखभाल करणं सोपं जातं व मऊ, हलक्या टेक्सचरसह आराम मिळतो.

त्याशिवाय बांबू कॉटन, कॉटन टेन्सेल आणि १०० % कोम्ब्ड कॉटन, रोटरी, हाय डीपीआय डिजिटल आणि मेटॅलिक प्रिंट्स असे दर्जेदार कापड त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

**बाथ कलेक्शनमध्ये** दर्जेदार टेरी टॉवेल्सचा समावेश करण्यात आला आहे, जे वेगाने पाणी शोषून घेतात आणि मखमली स्पर्शाची अनुभूती देतात. कलेक्शनमध्ये बांबू कॉटन, झिरो ट्विस्ट, कोम्ब्ड कॉटन टॉवेल्स अशा त्वचेसाठी योग्य आणि मऊ स्पर्शाच्या उत्पादनांचा समावेश आहे.

**ब्लँकेट्स आणि क्विल्ट्समध्ये** हवामानासाठी सुसंगत उत्पादने येतात. त्यात मिंक, फ्लॅनेल, फ्लीस, शेर्पा, फॉ फरपासून अल्ट्रा-प्रीमियम सुपर क्लाउडीचा समावेश होतो, जे ऊब आणि मखमली फील देतात. रेमंडचा दिमाखदार वारसा त्यांच्या वुल ब्लँकेट्स कलेक्शनमध्ये दिसून येतो. ही ब्लँकेट्स ऊबदारपणा आणि आराम देतात.

## हायग्रीव्हज फॅब्रिक्सचे प्लॅटिना इंडिया

हायग्रीव्हज फॅब्रिक्स या वाइ- विड्थ कापडाच्या आघाडीच्या उत्पादक आणि निर्यातदार कंपनीद्वारे त्यांचा नवा ब्रँड प्लॅटिना इंडिया लक्झरी बेडिंग विभागात लाँच केला जाणार आहे. प्लॅटिना इंडियाद्वारे बेडशीट्स, बेडसेट्स, कम्फर्टर्स, पिलो केसेस १४०० टीसीज कापडात, नाजूक कलाकुसर, प्रिंट, काच शीटवर प्रिंट आणि एम्ब्रॉयडरीचा मेळ यांसह उपलब्ध केले जाणार आहे. प्रिंट आणि एम्ब्रॉयडरीचा मेळ घालण्याची क्षमता या ब्रँडची अनोखी क्षमता आहे.

ब्रँडद्वारे १०० टक्के कॉटन फिलिंगसह कम्फर्टर उपलब्ध केले जातात,


PLATINA INDIA Collection

जे एरवी प्रामुख्याने मानवनिर्मित फायबर फिलिंगसह मिळतात. प्लॅटिना इंडिया बेडिंग इजिप्शियन कॉटन, सुपिमा, ऑरगॅनिक कॉटन, मायक्रो- टेन्सेल, बांबू, बनाना आणि पायनॅपल अशा उच्च दर्जाच्या साहित्यापासून बनवलेले असते.

प्लॅटिना इंडिया लक्झरी होम टेक्स्टाइलवर लक्ष केंद्रित करणार असून त्यांची उत्पादने अभिरूची, स्टाइल व आरामदायीपणाचे प्रतीक असतील. प्लॅटिना इंडिया बेडिंगच्या वैशिष्ट्यांमध्ये अभिजात डिझाइन, असामान्य दर्जा, बारकाव्यांकडे अचूक लक्ष, दर्जेदार कारागिरी यांचा समावेश होतो व त्यांचे बेड लिनन दर्जाचा नवा मापदंड प्रस्थापित करणारे आहे.

हायग्रीव्हज फॅब्रिक्स ही प्लॅटिना इंडियाची पेरेंट कंपनी चार पिढ्यांपासून टेक्स्टाइल व्यवसायात कार्यरत असून दर्जा आणि तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान त्यांच्याकडे आहे.

## मस्पारचे 'सीरीन हेवन'

**मस्पार** HGH India च्या **१७ व्या** आवृत्तीमध्ये काहीतरी खास घेऊन येत आहे आणि ते म्हणजे **आरामदायीपणा, मनःशांती व आलिशनता यांचा मेळ** घालणारे कलेक्शन

आपल्या घराला शांततामय, अभिजात व सहजपणे स्टायलिश बनवू इच्छिणाऱ्यांसाठी सीरीन हेवन कलेक्शन डिझाइन करण्यात आले आहे. मनाला आराम देणारे रंग, समृद्ध, दिमाखदार कापड आणि प्रत्येक तपशीलावर लक्ष केंद्रित करत या कलेक्शनमधील प्रत्येक


Serene Haven Collection

उत्पादन तुमच्या घराचं सौंदर्य वाढवेल.

तुम्ही घराला नवे स्वरूप देत असाल किंवा एखादा कोझी कॉर्नर सजवत असाल, मस्पारचे लेटेस्ट डिझाइन घराला तुमच्या आवडीप्रमाणे सजवण्यासाठी मदत करतात.

## अर्बन बेसिक्स x नासा (जिओकॉमर्स रिटेल)

अर्बन बेसिक्सद्वारे अवकाशाची भव्यता आणि संशोधनाधाची गुणवत्ता यांपासून प्रेरणा घेत आकर्षक कलेक्शन सादर केले जाणार आहे. यातील **प्रत्येक डिझाइनला नासा युएसएतर्फे मान्यता देण्यात आली आहे.**

सर्व वयोगटातील स्वप्नाळू, संशोधक आणि अवकाशप्रेमींसाठी तयार करण्यात आलेल्या या कलेक्शनमध्ये पुढील उत्पादनांचा समावेश आहे -

- गॅलाक्टिक प्रिंट्स असलेले **बेडशीट्स** ज्यामुळे तुमच्या खोलीत तारे अवतरतील.
- कॉस्मिक स्टाइल आणि रोजच्या आरामदायीपणासाठी **कुशन्स आणि नेक पिलोज.**
- नासाचे प्रसिद्ध चिन्ह आणि इंटरस्टेलर पॅटर्न्स असलेले **टॉवेल्स, कम्फर्टर्स व डोहर्स**

मऊ कापडापासून बोल्ड, भविष्यवेधी डिझाइन्सपर्यंत यातील प्रत्येक उत्पादन नाविन्य, उत्सुकता आणि साहसी वृत्तीला सलाम करणारे, तुमचे घर केवळ राहाण्याची जागा नव्हे, तर शोधाची संधी देणारे



Urban Basics x NASA

विश्व बनवणारे आहे.

घरबसल्या विश्वाचा धांडोळा घ्या. ताऱ्यांखाली झोपा आणि आकाशाच्या पलीकडे जात स्वप्नं पाहा.

## अमरावथी टेक्स्टाइल्सतर्फे ओडाई (बेड आणि बाथ लिनन)

ओडाई हे अमरावथी टेक्स्टाइल या १९७० मध्ये स्थापन झालेल्या तमिळनाडूतील सर्वात जुन्या व आदरणीय होम टेक्स्टाइल एक्स्पोर्ट युनिटचे नवे उत्पादन आहे. नाविन्यपूर्ण डिझाइन, असामान्य दर्जा


Oodaii Collection

आणि शाश्वत पद्धतींचा वापर यांसह ओडाई आपला वारसा पुढे नेत असून प्रत्येक उत्पादनामध्ये आधुनिक व नवीन स्वरूप समाविष्ट करत आहे. हा ब्रँड आकर्षक डिझाइन, दर्जेदार कलाकुसर आणि पृथ्वीसाठी आपुलकी यांच्याशी बांधिलकीतून आलिशानतेची समीकरणे नव्याने प्रस्थापित करत आहे. ब्रँडचे प्रत्येक उत्पादन वारसा, नैतिक मूल्ये, आधुनिक जाणिवा यांच्या समीकरणातून बनवले जात आहे.

## फर्निशिंग फॅब्रिक्स आणि ब्लाइंड्स

### फ्लोअर अँड फर्निशिंग (एफ अँड एफ)

फ्लोअर अँड फर्निशिंगद्वारे होम फर्निशिंग फॅब्रिक्स, वॉलपेपर्स, रग्ज आणि वॉल टु वॉल कार्पेट्सची श्रेणी सादर केली जाणार आहे. प्रिंटेड, विणलेली, एम्ब्रॉयडरी आणि जॅकार्ड डिझाइन्सची श्रेणी सादर करत ब्रँडद्वारे HGH India 2025 मध्ये भारतीय


Floor & Furnishing

घरांसाठी आधुनिक व अभिजात उत्पादने उपलब्ध केली जातील.

### फेनरो इंडस्ट्रीज

फेनरो इंडस्ट्रीज HGH India 2025 मध्ये त्यांची अद्ययावत विंडो फॅशन इनोव्हेशन्स सादर करण्यासाठी सज्ज आहे. फेनरोद्वारे आधुनिक इंटेरियर्सना नवा लूक दिला जाणार असून त्यात **रोलर ब्लाइंड फॅब्रिक्स** आणि **झिब्रा ब्लाइंड फॅब्रिक्स** यांचा समावेश असेल. या नव्या रेंजद्वारे स्टाइल आणि उपयुक्तता अशा दोन्ही गरजा पूर्ण केल्या जाणार आहेत.

नवीन **रोलर ब्लाइंड फॅब्रिक्स** सुस्पष्ट, मिनिमल डिझाइन व


Roller Blinds

सहजपणे काम करणारे असून ते घरे, कामाची ठिकाणे, भव्य प्रकल्पांसाठी योग्य आहे. साधेपणा आणि उपयुक्तता यांचा मेळ घालण्यासाठी ही उत्पादने परफेक्ट आहेत. दुसरीकडे **झिब्रा ब्लाइंड फॅब्रिक्स** खासगीपणा आणि प्रकाशावर नियंत्रण या दोन्हींचा समतोल साधत कोणत्याही खोलीला वेगळं रूप बहाल करतील.

विचारपूर्वक रचना आणि आकर्षक डिझाइनसह तयार करण्यात आलेले हे कलेक्शन **ब्लेंडिंग स्मार्ट लिव्हिंग विथ टाइमलेस स्टाइल** या फेनरोच्या ध्येयाशी सुसंगत आहे.

खिडक्यांचे सौंदर्य कसे विकसित होत गेले याची झलक फेनरोसह पाहा १७ व्या HGH India मध्ये

### डिझायनर्स रिसोर्सेस

डिझायनर्स रिसोर्स हा होम फर्निशिंगमधील लक्झरीचे समीकरण नव्याने तयार करण्यासाठी पारंपरिक कलाकुसर व आधुनिक सौंदर्य यांचा मेळ घालणारा आर्टिसनल ब्रँड आहे. भारताच्या समृद्ध कलात्मक वारशाच्या सहकार्याने कंपनीद्वारे या कारागिरांचे कौशल्य व वारसा साजरे करणारे आकर्षक टेक्स्टाइल्स उपलब्ध केले जाणार आहेत. घराचे स्वरूप बदलायचे असो किंवा हॉस्पिटॅलिटीचे स्वरूप नव्या उंचीवर न्यायचे असो, डिझायनर्स रिसोर्सद्वारे सुसंस्कृतता,


Designers Resource

टिकाऊपणा आणि अभिजातता यांचा मेळ घालणारे टेक्स्टाइल्स उपलब्ध केले जातात.

## स्पेशॅलिटी टेक्स्टाइल्स

### इस्सेन स्पेशॅलिटी फिल्म्स लि.

२००२ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या इस्सेन स्पेशॅलिटी फिल्म्स लि. ने खास प्लॅस्टिक उत्पादन क्षेत्रातील आघाडीची उत्पादक आणि निर्यातदार म्हणून प्रस्थापित केले आहे. जागतिक पातळीवरील होम फर्निशिंग आणि होम इम्प्रुव्हमेंट उद्योगाला कंपनीतर्फे सेवा दिली जाते.


PEVA table cloth

पेरेंट कंपनी राजू इंजिनियर्स लिमिटेडकडून मिळालेल्या तांत्रिक कौशल्याच्या मदतीसह इस्सेन आज २४ पेक्षा जास्त देशांतील विश्वासार्ह पुरवठादार बनली आहे. जगातील सर्वाधिक इन्स्टॉल्ड क्षमतेसह इस्सेन PEVA नॉन- अधेसिव्ह शेल्फ लायनर्सची दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी उत्पादक आणि PEVA शॉवर कर्टन्स व लायनर्सची जागतिक पातळीवरील तिसरी सर्वात मोठी कंपनी आहे. उत्पादन श्रेणीमध्ये सहा प्रमुख विभागांचा समावेश आहे – बाथ एरिया आणि अक्सेसरीज, कृत्रिम झाडे व फुले, किचन आणि डायनिंग, स्टोअरेज व ऑर्गनायझेशन, फिटनेस आणि लाइफस्टाइल, आउटडोअर व युटिलिटी उत्पादने. इस्सेन जगभरात सस्टेबिलिटीस प्राधान्य देणारी कंपनी म्हणून प्रसिद्ध असून कंपनीद्वारे पोस्ट- कन्झ्युमर जीआरएस आणि आरसीएस सर्टिफाइड रिसायकल्ड मटेरियल्स उपलब्ध केली जातात.

इस्सेनने आतापर्यंत दोनदा आयकियाकडून 'सप्लायर ऑफ द इयर' पुरस्कार मिळवला आहे. कंपनीचे संपूर्ण कामकाज १०० टक्के अक्षय उर्जेवर चालते. कचऱ्यासाठी संपूर्ण रिसायकलिंग प्रक्रिया आणि इन- हाउस वेस्टवॉटर ट्रीटमेंट प्लँट कार्यरत आहे. यातून सस्टेनेबल पद्धती आणि जागतिक दर्जाच्या उत्पादन क्षमता यांचा मेळ घालता येत असल्याचे दिसून येते.

### शिवा टेक्सयार्न

पारंपरिक टेक्स्टाइल कलाकुसर आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या **शिवा टेक्सयार्नला सस्टेनेबल आणि परफॉर्मन्स ड्रिव्हन उत्पादने** १७ व्या HGH India मध्ये सादर करताना आनंद होत आहे.

- **घर आणि हॉस्पिटॅलिटी टेक्स्टाइल्स** – प्रीमियम मॅट्रेस प्रोटेक्टर्स (लॅमिनेटर्स/कोटेड), अल्ट्रा- सॉफ्ट बांबू आणि मायक्रोफायबर टॉवेल्स, पर्यावरणपूरक बांबू बेडशीट्स, कोझी क्विल्ट्स
- **उपयुक्त उत्पादने** – टिकाऊ वॉलपेपर्स, अँटी- स्किड मॅट्स, वैविध्यपूर्ण कोटेड कॅनव्हास युटिलिटी उत्पादने

**दर्जा, नाविन्य आणि शाश्वतता** यांच्याप्रती बांधिलकी जपत शिवा टेक्सयार्नद्वारे आधुनिक राहाणीमानासाठी टेक्स्टाइलचा अनुभव नव्याने तयार केला जात आहे.


Shiva Texyarn

# मास्टर क्राफ्टस्पर्सन्स | इंडियाज रिच कल्चर | हँडीक्राफ्ट्स

**Indian heritage**
HANDICRAFTS | KHADI | COIR | JUTE

भारताला कित्येक शतकांपासून कुशल कारागीर, विणकर आणि हस्तकलाकारांचा वारसा लाभला आहे. धातू, लाकूड, सिरॅमिक, टेराकोटा, काच, टेक्स्टाइल, केन, बांबू आणि विविध नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्यापासून कला, पेंटिंग्ज, प्रिंटिंग, एम्ब्रॉयडरी, वेगवेगळ्या प्रकारची भारतीय हस्तकला यांना वैविध्यपूर्ण आणि समृद्ध वारसा लाभला आहे.

HGH India द्वारे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक, कलाकुसरीच्या वारशाला १७ व्या HGH India अंतर्गत **इंडियन हेरिटेजमध्ये** चालना दिली जाणार आहे. HGH India तर्फे गेल्या दहा आवृत्त्यांपासून हा उपक्रम चालवला जात असून त्याद्वारे भारतीय कारागिरांना हस्तकलेच्या वस्तू, सुशोभित वस्तू, हँडलूम व खादीपासून तयार केलेले टेक्स्टाइल्स, बांबू आणि केनची उत्पादने, कॉयर व ज्युट उत्पादने आणि फॅशन अक्सेसरीज अशा उत्पादनांचे मार्केटिंग करण्यासाठी प्रभावीपणे सहकार्य केले जात आहे.



डावीकडून उजवीकडे: श्रीमती श्यामालता गहलोत (चांदीवरील कारागिरी), श्रीमती सुतपा भुइयां (हस्तकढाई) श्री नूरदीन चित्रकार (बंगाल पट्टचित्र), श्री मोहम्मद मतलूब (लाकडावरील नक्षीकाम)

HGH India च्या या आवृत्तीमध्ये विविध राष्ट्रीय पुरस्कार विजेते त्यांचे हस्तकौशल्य एकाच छताखाली सादर करतील. रिटेलर्स, आर्किटेक्ट्स, इंटेरियर्स डिझायनर्सना त्यांच्यासह दीर्घकालीन सोर्सिंग सहकार्य प्रस्थापित करण्याची संधी इथे मिळणार आहे. आपले कौशल्य सादर करणार असलेल्या मास्टर क्राफ्ट्सपर्सन्समध्ये फर्निचर, लॅम्प्ससारख्या वस्तूंवर नाजूक कोफ्तगिरी – सोने आणि चांदीच्या कलाकुसरीसाठी प्रसिद्ध असलेल्या राजस्थानच्या **श्रीमती श्यामलता गेहलोत** यांचा समावेश आहे. बंगाल पट्टीचित्राचे मास्टर, पश्चिम बंगालचे **श्री. निरदिन चित्रकार** यांच्याकडे एमएसएमईअंतर्गत नॅशनल मेरिट सर्टिफिकेट आहे. त्यांच्या पत्नी **श्रीमती सुतापा भुनिया, मुंबई** याही कलामनी आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या असून त्या हँड- एम्ब्रॉयडरी कौशल्य सादर करतील. **दिल्लीचे श्री. मोहंमद मतलूब** हे प्रतिष्ठित शिल्प गुरू पुरस्काराचे मानकरी फाइन वुड कार्व्हिंगचा वारसा सजीव करतील

## सेवा

### मेट्रो

बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे पोहोचण्याचा विशेषतः ट्रॅफिक आणि गर्दीच्या वेळी सर्वात सोपा मार्ग म्हणजे **गोरेगाव ईस्ट मेट्रो स्टेशनवरून मुंबई मेट्रो लाइन ७** (रेड लाइन) घेणे. मेट्रो स्टेशन बॉम्बे एक्झिबिशन सेंटरच्या बाहेरच चालत १०० मीटर अंतरावर आहे. हा सर्वात सोयीस्कर मार्ग असून त्यासाठी ट्रान्सफर करण्याची किंवा अतिरिक्त वाहनाची गरज पडत नाही. दहिसर ते गुंडावली (अंधेरी पूर्व) मार्गावरील ही मेट्रो लाइन वाहतुकीच्या इतर पर्यायांशी जोडणारी आहे.

### पार्किंग

बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये व्हिजिटर्स कार पार्किंगसाठी विशेष परिसर राखून ठेवण्यात आला आहे. या ठिकाणासाठीचा प्रवेश गेट १ वरून आहे. ही सुविधा नेस्कोद्वारे हाताळली जात आहे. सामान नेणाऱ्या वाहनांना व्हिजिटर्स पार्किंग एरियामध्ये प्रवेश नाही.

### सामान ठेवण्यासाठी

व्हिजिटर्स आणि एक्झिबिटर्सच्या सोयीसाठी HGH India ने हॉल्समध्ये व्हिजिर रजिस्ट्रेशनजवळ सामान ठेवण्याची सुविधा केली आहे. ट्रेड शो दरम्यान सकाळी ९ ते संध्याकाळी ६.३० पर्यंत व्हिजिटर्स आणि एक्झिबिटर्सना या सुविधेचा मोफत वापर करता येणार आहे.

### मोफत शटल बस सेवा

व्हिजिटर्स आणि एक्झिबिटर्सच्या सोयीसाठी HGH India ने ट्रेड शो चा व्हेन्यु आणि मुंबई शहरातील महत्त्वाच्या एंट्री व एक्झिट पॉइंट्सपर्यंत तसेच जवळच्या रेल्वे स्टेशनपर्यंत बस सेवा ठेवली आहे. त्यामध्ये डोमेस्टिक एयरपोर्ट, इंटरनॅशनल एयरपोर्ट, महत्त्वाची रेल्वे स्टेशन्स – बोरिवली (पूर्व), राम मंदिर (पूर्व), अंधेरी (पूर्व), आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे मेट्रो स्टेशन यांचा समावेश आहे. शटल बसचे पिक अप आणि ड्रॉप पॉइंट्स व वेळापत्रक आमच्या www.hghindia.com वेबसाइटवर पाहायला मिळेल. ते व्हेन्यू आणि इन्फर्मेशन डेस्कवरही डिस्प्ले केले जाणार आहे.

### कार रेंटल्स

एक्झिबिटर्स आणि व्हिजिटर्सना अधिकृत ट्रॅव्हल एजंट, टॅमरिंड ग्लोबल सर्व्हिसेस प्रा. लि. कडून वेगवेगळ्या प्रकारच्या इकॉनॉमिक आणि लक्झरी कार्स, ड्रायव्हरसह भाडेशुल्कावर गेता येणार आहे. ट्रेड शो चे चारही दिवस वाहन ठेवन घ्यायचे असेल, तर त्याप्रमाणे ट्रॅव्हलला आगाऊ कळवावे लागेल म्हणजे तुमच्यासाठी वाहन राखीव ठेवले जाईल. बुकिंगसंदर्भात सर्व माहितीसाठी संपर्क

**श्री. हेमंत कारंडे : +91 96 194 69181.**

### टॅक्सी

मुंबई मेट्रोपोलिटन रिजनद्वारे मीटरनुसार आणि रेडिओ टॅक्सी (कॉल अ टॅक्सी) सेवा दिली जाते. ऑनलाइन टॅक्सी बुकिंगची संकल्पना मुंबईमध्ये सोयीस्कर आणि लोकप्रिय आहे. रेडिओ टॅक्सी डोमेस्टिक आणि इंटरनॅशनल एयरपोर्ट, सेंट्रल रेल्वे स्टेशन्सवर जिथे बाहेरगावच्या ट्रेन्स निघतात तिथे हायर करता येतील. सोप्या बुकिंगसाठी ओला व उबर ॲपही डाउनलोड करता येईल.

### रेस्टॉरंट्स/कॅफेटेरिया

सेटअप कालावधीदरम्यान व्हेन्यूवर विविध ठिकाणी कॅफेटेरियाची सोय असेल. प्रत्येक हॉलमध्ये कन्स्ट्रक्शन टीम्ससाठी पेमेंट बेसिसवर खाद्यपदार्थ आणि पेयांची व्यवस्था केलेली असेल. संपूर्ण खाद्यसेवा नेस्कोद्वारे हाताळली जाणार असून नियमांनुसार बाहेरचे कोणतेही खाद्यपदार्थ आत आणण्यास परवानगी नाही.

१ ते ४ जुलै दरम्यान ट्रेड शो मध्ये फुड कोर्ट्स, रेस्टॉरंट्स आणि कॅफेटेरियाज विविध ठिकाणी, हॉलच्या आत तसेच इतरत्र कार्यरत असतील. आयोजकांद्वारे खास लाउंजही तयार केले जाणार असतील, जे पात्र एक्झिबिटर्स आणि व्हिजिटर्ससाठी लागू असतील.

### लाउंजेस

HGH India द्वारे व्हिजिटर्स आणि एक्झिबिटर्ससाठी फ्रुट लाउंज, पॉपकॉर्न लाउंज (हॉल ६), फुट स्पा (हॉल ३), हॉट लाउंज (हॉल ४) अशा अनोख्या सुविधाही देण्यात आल्या आहेत. हे लाउंजेस सर्व पात्र एक्झिबिटर्स आणि व्हिजिटर्ससाठी बिझनेस अवर्समध्ये संपूर्ण लागू असतील. या लाउंजेसमुळे त्यांना पटकन ब्रेक घेऊन परत आपल्या कामाला लागता येईल.

त्याशिवाय या हॉल्समध्ये व्हिजिटर्ससाठी व्हिजिटर्स लाउंजेस असतील, जे भेटीगाठींसाठी किंवा विश्रांतीसाठी वापरता येतील.

### प्रार्थना खोली

ट्रेड शोदरम्यान प्रार्थना करण्यासाठी प्रार्थनेची खोलीही तयार करण्यात येणार आहे. चिन्हांच्या मदतीने किंवा हॉल्समध्ये असलेल्या इन्फर्मेशन डेस्कच्या मदतीने या खोलीचे नेमके ठिकाण शोधता येईल.

### मीडिया लाउंज

मीडिया लाउंज हॉल ३ मध्ये तयार करण्यात आला असून तिथे अधिकृत मीडिया व्यक्तींसाठी इंटरनेट, वर्किंग डेस्क आणि खानपानाची सुविधा करण्यात आली आहे.

### वैद्यकीय सेवा (प्रथमोपचार)

व्हिजिटर्स आणि एक्झिबिटर्सचे रोग्य व सुरक्षेसाठी HGH India ने प्रथमोपचार आणि प्राथमिक वैद्यकीय सुविधांची व्यवस्था केली आहे. त्याला 'फर्स्ट एड' असे नाव देण्यात आले असून ते हॉल्समध्ये रजिस्ट्रेशन एरियजवळ असेल. सेटअप (२८ ते ३० जून) आणि ट्रेड शो दरम्यान (१ ते ४ जुलै) व्हेन्यूवर पूर्णवेळ ॲम्ब्युलन्सची सुविधाही करण्यात आली आहे. कोणत्याही वैद्यकीय इमरजन्सीसाठी संपर्क – डॉक्टर ऑन ड्युटी - +91 98 202 37631